

देगलूर : बाबूराव तुकाराम इगंळे सेवानिवृत्त यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला.

# बाबूराव तुकाराम इगंळे सेवानिवृत्त

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालयातील कर्मचारी बाबुराव तुकाराम इगंळे हे नियत वयोमानानुसार (ता.३१) मे सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने त्यांचा महाविद्यालयाच्या वतिने निरोप समारंभ कार्यक्रमात सपत्नीक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ.व्या. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेबरेकर होते, प्रमुख पाहूणे संस्थेचे कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार, प्राचार्य. डॉ. मोहन खताळ, निवृत्ती गोविंदवार होते. इगंळे यांनी महाविद्यालयात ग्रंथालय परिचर म्हणून ३२ वर्ष सेवा केली. प्राचार्य खताळ तसेच सहायक ग्रंथपाल श्रीनिवास नाईक यांनी मनोगत पर भाषण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. रत्नाकर लक्षट्टे यांनी मानले. या वेळी साधना शाळेतील कर्मचारी दिलीप जाधव, ग्रंथपाल शिंदे आदी उपस्थित होते.